# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०४/०६/२०२३ (रविवार)

..........................................................................

## विना रॉयल्टी अवैधरित्या रेती चोरून नेणा—या आरोपीतांविरूध्द कारवाई

पोलीस स्टेशन कुही :— अंतर्गत मौजा कळमना शिवार ३५ कि.मी पश्चिम, येथे यातील आरोपी नामे— १. राशीद अली मोहम्मद अली वय ३५ वर्ष रा.मोठा ताजबाग नागपुर आ.क्र २. प्रकाश शालीक खंडारे वय ३८ वर्ष रा. बेसनबाग नागपुर यांनी आपआपले ताब्यातील **टिप्पर क्र.एम.एच.४० बी.एल २८६२ व टिप्पर क्र एम. एच.२७ बी.एक्स ०९९० मध्ये विना रॉयल्टी ०८ ब्रास रेती कि. १०८६०/— रू असा दोन्ही टिप्परसह एकुण ४०१०८६०/—रू चा मुद्देमाल** दिनांक २८/०५/२३ चे ०६.०० वा दर. अवैद्यरित्या विनापरवाना वाहतुक करित असतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोउपनि हरिहर सोनकुसरे पोस्टे कुही यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे नमुद दोन्ही आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ/ प्रमोद बंन्सोड मो.न. ९६७३६०८६४२ हे करीत आहे.